संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई- १.
25 FEB 2022
प्राप्त झाले सही........

**महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सह संचालक संवर्गातील अधिका-यांची दि.१.१.२०१५ ची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासुची.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक** :- संलेको २०२१/प्र.क्र.७०/कोषा.प्रशा-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दि.२४.२.२०२२.

वाचा:- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संलेको-२०१५/प्र.क्र.०५/कोषा प्रशा-२, दि.२०.०३.२०१५
२) वित्त विभाग,शासन आदेश क्र. संलेको २०१९/प्र.क्र.१२२/कोषा प्रशा-२, दि.२३.११.२०२१.
३) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.जेसूची २०२१/प्र.क्र.७०/कोषा प्रशा-२, दि.२.७.२०२१.

**शुध्दीपत्रक:-**

संदर्भ क्र.१ च्या शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सह संचालक संवर्गातील अधिकाऱ्यांची दि.१.१.२०१५ ची स्थिती दर्शविणारी अंतिम ज्येष्ठतासुची प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. श्री.प्र.दे. जैन यांना संदर्भ क्र.२ च्या शासन आदेशान्वये सह संचालक संवर्गातील पदोन्नतीचा मानीव दिनांक ४.७.२०१४ हा (श्रीमती रा.मि.राऊत यांनी सह संचालक या पदोन्नतीच्या पदाचा कार्यभार स्विकृत केल्याचा) मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे सह संचालक संवर्गातील अधिका-यांच्या दि.१.१.२०१५ रोजीच्या अंतिम ज्येष्ठतासुचीमध्ये श्री.प्र.दे.जैन यांचे स्थान श्री.सु.दा.सारंगकर (ज्ये.क्र.७०) यांचेनंतर व श्रीमती रा.मि.राऊत (ज्ये.क्र.७१) यांचेवरील ज्येष्ठता क्र.७०(अ) येथे अंतर्भूत करण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सह संचालक संवर्गाची दि.२.७.२०२१ च्या परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यांत आलेल्या दि.१.१.२०१६ ते दि.१.१.२०२० ची स्थिती दर्शविणाऱ्या अंतिम जेष्ठतासूचीमध्ये श्री.जैन यांचे स्थान श्री.सु.दा.सारंगकर यांचेनंतर व श्रीमती रा.मि.राऊत यांचेवर अंतर्भूत करण्यात येत आहे.

४. सदर शुध्दीपत्रक मूळ अर्ज क्र.८५८/२००९ व मूळ अर्ज क्र.१५५/२०१३ मध्ये दिलेल्या निर्णयाच्या अधीन राहून तसेच मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्र.७८७/२०२० व मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका (स्टॅप) क्र.३७५०/२०२२ च्या संदर्भात पारित होणाऱ्या निर्णयांच्या व विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील न्यायनिर्णयाच्या व सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३३६/१६-ब, दि.७.५.२०२१ मधील तरतूदीच्या अधीन राहिल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(ता.र.पवार)
अवर सचिव, वित्त विभाग.

प्रत,

महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर*
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई*
अ.मु.स. (ले. व को.) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख*
संबंधित अधिकारी*
निवडनस्ती कोषा प्रशा-१ व २, वित्त विभाग, मंत्रालय , मुंबई
(*संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचेमार्फत)